**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,

( नविन इमारत ), देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.

Website :- www.jdheaurangabad.org.in/ E-mail:- jdheaur_2007@rediffmail.com

फोन नंबर :- ०२४०-२३३१९१३ फॅक्स नंबर :- ०२४०२३३१९९३

जा.क्र. शिसस/उशि/औवि/अनुदान-३/ २०२१/2260 दिनांक :- ०८.०७.२०२१

प्रति,

मा.कुलगुरु,

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक, जि. नागपूर.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नवीन महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत**

संदर्भ :- शासन आदेश क्रमांक एनजीसी २०२१ /(०२/२१) मशि-४ दिनांक १५ जून २०२१

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयान्वये आपल्या विद्यापीठाअंतर्गत बीड जिल्ह्यातील खालील नविन महाविद्यालयास शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण क्रमांक एनजीसी-२०१७/ २२९/१७/मशि-४ दिनांक १२/१०/२०१७ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून <u>कायम विनाअनुदानित तत्वावर</u> मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा |
|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ज्ञानदेव लिंबाजी तांबारे वरिष्ठ महाविद्यालय, तागडगाव ता.शिरुर (कासार) जि.बीड | १. बी.ए. (बॅचलर ऑफ आर्टस)<br>२. डिप्लोमा इन लायब्ररी सायन्स ॲन्ड इन्फॉर्मेशन |

१ महाविद्यालयाने मंजूरी देण्यात आलेल्या नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रमा बाबत भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र रु. १००/- नॉन जुडीशियल स्टॅम्प पेपरवर देण्यात आलेली असल्याने संलग्नतेची प्रक्रिया सुरू करावी.

२ शासन निर्णय दिनांक २० एप्रिल २०१८ मधील क्र.३ नुसार संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/कर्मचारी वर्ग नेमणूक आवश्यक आहे. तसेच इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात.

३ महाविद्यालयाने मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

४ विद्यापीठाने महाविद्यालयाचा नियतकालीक आढावा घेऊन महाविद्यालयामध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसुन आल्यास सदर महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याबाबत तसा अहवाल सादर करावा.

५ महाविद्यालयाने नॅक मुल्यांकन करून घेण्यासाठी प्रयत्न करावा व या बाबत विद्यापीठाने पाठपुरावा करावा ही जबाबदारी विद्यापीठाची राहील.

६ मा.उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठ,नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्र. २४४६/२०१३ व २४४८/२०१३ या मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी पूर्ण होतात ही बाब तपासणे विद्यापीठाची राहील.

**तरी वरीलप्रमाणे नवीन विद्याशाखांस देण्यात आलेल्या अटी व शर्ती पूर्ण झालेल्या असुन वरील निकषांची पूर्तता** झालेली आहे याची आपल्या स्तरावरून खात्री तसेच वेळोवेळी पाठपुरावा करण्यात यावा.

आपला विश्वास,

(डॉ.रणजितसिंह निंबाळकर)

सहसंचालक, ( उच्चशिक्षण )

औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

SDM1 KGOPRO
PRIME CAMERA